# उल्हासनगर महानगरपालिका

जा.क्र. उमपा/आस्था/मा.अ./ ९३/१४
दिनांक – ०२/०५/२०१४

वाचा:– १)माहिती अधिकार अधिनियम २००५ व २)कार्यालयीन आदेश क्र.उमपा/साप्रवि/आस्था/मुली/५६४/०७,दि. २१ जूलै २००७

## कायालयीन आदेश

मी आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका मला केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५(१)(२) व १९(१) अन्वये सदर अधिनियमाची कार्यक्षमपणे अंमलबजावणी करण्यासाठी महापालिकेत खालिल अधिकारी/कर्मचारी यांना अपिलीय अधिकारी, माहिती अधिकारी व सहाय्यक माहिती अधिकारी म्हणून नियुक्त करीत आहे.

| अक्र | अपिलीय अधिकारी | माहिती अधिकारी | सहाय्यक माहिती अधिकारी | विभाग |
|---|---|---|---|---|
| १ | उप आयुक्त(अ.बा.नि.वि. व पदपथ विभाग) | सहाय्यक आयुक्त (अ.बां.नि.वि.) | संबंधित लिपीक | अतिक्रमण, पदपथ विभाग |
| | | सहाय्यक आयुक्त प्र.स.क्र. १ | वरिष्ठ लिपीक | प्रभाग समिती क्र. १ |
| | | सहाय्यक आयुक्त प्र.स.क्र. २ | वरिष्ठ लिपीक | प्रभाग समिती क्र. २ |
| | | सहाय्यक आयुक्त प्र.स.क्र. ३ | वरिष्ठ लिपीक | प्रभाग समिती क्र. ३ |
| | | सहाय्यक आयुक्त प्र.स.क्र. ४ | वरिष्ठ लिपीक | प्रभाग समिती क्र. ४ |
| २ | उप आयुक्त( स्थानिक संस्था कर विभाग ) | अधिक्षक | वरिष्ठ लिपीक | स्थानिक संस्था कर विभाग |
| ३ | उप आयुक्त (मुख्यालय) | महापालिका सचिव | संबंधित लिपीक | सचिव कार्यालय |
| | | | | सार्वजनिक बांधकाम समिती |
| | | | | नियोजन व विकास समिती |
| | | | | पाणी पुरवठा व विकास समिती |
| | | | | आरोग्य परिक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती |
| | | | | माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती |
| | | | | गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| | | | | क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती |
| | | | | महिला व बाल कल्याण समिती |
| | | | | महसुल समिती |
| | | मुख्य लिपीक | वरिष्ठ लिपीक/लिपीक | सामान्य प्रशासन विभाग |
| | | मुख्य लिपीक | लिपीक | अभिलेखा विभाग |
| | | मुख्य लिपीक | संबंधित लिपीक | निवडणूक विभाग |
| | | विधी अधिकारी | संबंधित लिपीक | विधी विभाग |
| | | जनसंपर्क अधिकारी | लिपीक | जनसंपर्क कार्यालय |
| | | सहाय्यक मुख्य लेखा परिक्षक | रोखपाल (जनगणना) | जनगणना विभाग |
| ४ | उप आयुक्त (मालमत्ता) | मालमत्ता व्यवस्थापक | संबंधित लिपीक | मालमत्ता विभाग |
| ५ | उप आयुक्त (सुरक्षा) | सुरक्षाअधिकारी | वरिष्ठ सुरक्षारक्षक | सुरक्षा विभाग |
| ६ | उप आयुक्त (अग्निशमन) | अग्निशमन अधिकारी | संबंधित लिपीक | अग्निशमन विभाग |
| ७ | मुख्य लेखा अधिकारी | उप मुख्य लेखा अधिकारी | लेखाधिकारी | लेखा विभाग |
| ८ | मुख्य लेखा परिक्षक | सहा. मुख्य लेखा परिक्षक | वरिष्ठ लेखा परिक्षक | लेखा परिक्षण विभाग |
| ९ | कार्यकारी अभियंता(सा.बा.वि.) | संबंधीत उप अभियंता | कनिष्ठ अभियंता (सा.बा.वि.) | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| १० | वृक्ष अधिकारी तथा शहर अभियंता | सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी प्र.स. १ | संबंधित लिपीक | वृक्ष प्राधिकरण विभाग प्र.स. १ |
| | | सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी प्र.स. २ | संबंधित लिपीक | वृक्ष प्राधिकरण विभाग प्र.स. २ |
| | | सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी प्र.स. ३ | संबंधित लिपीक | वृक्ष प्राधिकरण विभाग प्र.स. ३ |
| | | सहाय्यक आयुक्त तथा वृक्ष अधिकारी प्र.स. ४ | संबंधित लिपीक | वृक्ष प्राधिकरण विभाग प्र.स. ४ |
| ११ | कार्यकारी अभियंता(विद्युत) | उप अभियंता (विद्युत) | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | विद्युत विभाग |
| १२ | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | उप अभियंता (पाणी पुरवठा) | शाखा अभियंता(पाणी पुरवठा) | पाणी पूरवठा विभाग |
| १३ | सहाय्यक संचालक(नगररचना) | नगररचनाकार | कनिष्ठ अभियंता | नगररचना विभाग |
| १४ | उप आयुक्त (भांडार) | भांडार विभाग प्रमुख | संबंधित लिपीक | भांडार विभाग |
| १५ | उप आयुक्त (आरोग्य) | मुख्य स्वच्छता निरिक्षक | संबंधित लिपीक | आरोग्य विभाग |
| | | उप निबंधक | संबंधित लिपीक | जन्म मृत्यू नोंदणी विभाग |
| | | वैद्यकिय आरोग्य अधिकारी | संबंधित लिपीक | वैद्यकिय आरोग्य विभाग, |
| १६ | उप आयुक्त (सु.श.रो.यो.) | प्रकल्प अधिकारी | समुह संघटक | सुवर्ण जयंती विभाग |
| १७ | उप आयुक्त (ना.सु.के.) | प्रोग्रामर | कनिष्ठ अभियंता (ना.सु.के.) | नागरी सुविधा केंद्र |
| १८ | उप आयुक्त (परिवहन) | वाहन व्यवस्थापक | संबंधित लिपीक | वाहन विभाग |
| १९ | उप आयुक्त(कर विभाग) | उप कर निर्धारक व संकलक | संबंधित कर निरिक्षक | मालमत्ता कर विभाग |
| २० | उप आयुक्त(शिक्षण विभाग) | प्रशासन अधिकारी,म.न.पा.शिक्षण मंडळ | १)अधिक्षक, शिक्षण मंडळ २)कार्यक्रम अधिकारी, सर्व शिक्षा अभियान | महापालिका शिक्षण विभाग |

सदर अधिनियम २००५ च्या कलम ५(२) नुसार माहितीच्या अधिकार अंतर्गत माहितीसाठी अथवा अपिलासाठी क्षेत्रिय स्वरावर प्राप्त होणारे अर्ज स्विकारून संबंधित माहिती अधिकारी/अपिलीय अधिकारी यांचेकडे सहाय्यक माहिती अधिकारी यानी पाठवावेत.

अधिनियमातल तरतुदीनुसार विहित नमुन्यात माहिती मिळण्याचा अर्ज माहिती अधिकाऱ्यास मिळाल्यानंतर संबंधित माहिती अधिकारी ३० दिवसापेक्षा अधिक नसेल एवढया कालावधीत अर्जदाराने मागीतलेली माहिती उपलब्ध करेल किंवा पुरेसे कारण देऊन अर्ज फेटाळील. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार विहीत मुदतीत माहिती पूरवण्याची जबाबदारी माहिती अधिकाऱ्याची राहील. प्रोग्रामर, नागरी सुविधा केंद्र यांनी माहितीसाठी प्राप्त होणारे अर्ज रू. १०/– इतके शुल्क आकारून स्विकारावेत तसेच दारिद्ररेषेखालिल अर्जदाराकडून शुल्क घेण्यात येवू नये. तसेच माहिती टपालाद्वारे मागीतली असल्यास टपाल खर्चही त्यावेळी घेण्यात यावा यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवावी. तसेच सदर अधिनियमांतर्गत माहिती म्हणून कागदपत्राच्या प्रती मागीतल्यास, माहिती देतेवेळी प्रतिप्रत रू. २/– इतके शुल्क आकारावे, इतरवेळी प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चाइतके आकारावे. याकामी येणाऱ्या सर्व अर्जाचा आढावा उपायुक्त (मुख्यालय) दरमहा घेतील. विहीत मुदतीत अर्जदारास माहिती उपलब्ध न झाल्यास या अधिनियमातील कलम २० नुसार संबंधित माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहतील याची नोंद माहिती अधिकाऱ्यांनी घ्यावी.

आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति:–

१) सर्व संबधित अधिकारी/ कर्मचारी,
२) सर्व विभाग प्रमुख
३) निवड नस्ती.

सोबत: केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियमाच्या शासन राजपत्राची मराठी अनुवादातील प्रत.